Punyanagari

# RBI gives nod to 11 payments banks

Date: 20/08/2015 | Edition: Mumbai | Page: 11 | Source: Bureau | Clip size (cm): W: 14 H: 7

Clip: 1 of 1

## पोस्टाची बँक होण्याचा मार्ग मोकळा

### आरबीआयकडून ११ संस्थांना पेमेंट बँकचे परवाने

नवी दिल्ली : भारतीय रिझर्व्ह बँकेने पेमेंट बँक सुरू करण्यासाठीच्या परवान्याकरिता अर्ज केलेल्या ११ अर्जदार संस्थांना तत्त्वतः पेमेंट बँक सुरू करण्याची परवानगी दिली आहे. या अकरा संस्थांमध्ये आदित्य बिर्ला नुव्हो, एअरटेल एम कॉमर्स, चोलामंडलम डिस्ट्रीब्युशन, भारतीय पोस्ट, फिनो पेटेक, एनएसडीएल, रिलायन्स इंडस्ट्रीज, टेक महिंद्रा आणि व्होडाफोन एम पेसा या कंपन्यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त सन फार्माचे मालक दिलीप शांतीलाल संघवी आणि पेटीएमचे विजय शर्मा या व्यक्तींनाही पेमेंट बँक सुरू करण्याची तत्त्वतः परवानगी देण्यात आली आहे. ही परवानगी पुढील १८ महिन्यांसाठी ग्राह्य धरण्यात येणार आहे. पेमेंट बँका एक लाख रुपयांपर्यंत ठेवी स्वीकारू शकतात. तसेच ग्राहकांसाठी चालू आणि बचत खाती उघडू शकतात. तसेच त्यांना इंटरनेट बँकिंग आणि डेबिट कार्ड वितरण करण्याचेही स्वातंत्र्य असते. मात्र, या बँका कर्ज देऊ शकत नाहीत किंवा क्रेडिट कार्ड वितरित करू शकत नाहीत. पेमेंट बँक परवान्यासाठी आरबीआयकडे एकूण ४१ अर्ज आले होते. त्यापैकी ११ अर्जदारांना तत्त्वतः परवाना देण्यात आला आहे.

